क्र. शिउसं/मा-३[१]/८६/३०७९-२९
शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
चर्नीरोड, मुंबई - ४०० ०२०.
दिनांक :-- 14 JUL 1986

प्रति,

अध्यक्ष,
त्रिवेणी वेल्फेअर सेंटर
वर्सोवा- मुंबई- ४०००६१

विषय :-- १९८६-८७ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत.

[ इंग्रजी माध्यमाच्या शाळा ]

महोदय,

शासन पत्र क्र. एसएसएन-१०८६/४४५ एन/माशि-१, दि. १ जुलै १९८६ अन्वये आपल्या संस्थेस ---वर्सोवा---- येथे इयत्ता --५ वी------ इंग्रजी माध्यमातून कायम विना अनुदान तत्वावर जून १९८६ पासून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. सदरहू परवानगी माध्यमिक शाळा संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या विशेष अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर देण्यांत येत आहे.

[अ] संस्था सदर इंग्रजी माध्यमिक शाळेसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करणार नाही वा आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ई.बी.सी.च्या] फी च्या परताव्याची मागणी करणार नाही. अशाप्रकारे संस्थेच्या अध्यक्षाच्या सहीनिशी हमीपत्र या कार्यालयास पाठविण्यांत यावे. [दोन दिवसांत]

[ब] संस्था सदर शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम आहे. असे लेखी निवेदन [दोन प्रतीत] देण्यांत यावे.

[क] सदर माध्यमिक शाळेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इत्यादी] काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

[ड] शासनाच्या वरील आदेशानुसार संस्था जे नवीन वर्ग उघडणार आहे. त्या वर्गात शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबईतर्फे माध्यमिक शाळांतून प्रवेशासाठी जे विद्यार्थी पाठवतील त्यांना प्राधान्याने प्रवेश द्यावा. कोणत्याही परिस्थितीत प्रवेश नाकारण्यांत येऊ नये.

आपल्या संस्थेस जून १९८६ पासून शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली असली तरी आपण खालील गोष्टींचा पूर्ण खुलासा करावा व तसे/ लेखी निवेदन दोन प्रतीत या कार्यालयास त्वरित द्यावे.

१/- आपली संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदलेली आहे.

२/- आपल्या संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत. तसे आढळून

आल्यास, आपणांस दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

३/- आपल्या संस्थेतर्फे दुसऱ्या माध्यमिक शाळा [मुंबईत अगर महाराष्ट्रात] चालविल्या जात आहेत काय ? आणि जर शाळा चालविल्या जात असतील, तर त्या शाळांपैकी कोणत्या एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली आहे काय ? असल्यास, शाळेचे नांव व मान्यता काढून घेतलेले वर्ष याचा खुलासा करावा.

४/- आपल्या संस्थेत कोणत्याही प्रकारचे आर्थिक गैरव्यवहार चालत नाही, असे स्पष्ट लेखी निवेदन दोन प्रतीत देण्यांत यावे. तसेच संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळांपैकी शासनाने ताब्यांत घेण्याबाबतचे प्रकरण शासनाकडे प्रलंबित नसल्या बाबतचे लेखी निवेदन २ प्रतीत देण्यांत यावे.

५/- शाळेने शिक्षक सेवा व शालेय प्रशासनाबाबत खात्याचे नियम व शाळांतील विद्यार्थी प्रवेशाचे बाबत खात्याच्या सूचना व आदेश यांचे काटेकोरपणे नेहमी पालन करावे,

तरी आपण वर नमूद केलेल्या "अ" ते "ड" अटींनुसार योग्यती कार्यवाही करावी. तसेच ही परवानगी वरील १ ते ५ मुद्यांवरील आपला खुलासा समाधानकारक आहे, असे गृहीत धरून देण्यांत येत आहे. तो समाधानकारक नसल्यास, परवानगी रद्द करण्याची, शिफारस शासनास करण्यांत येईल. या पांच मुद्यांवरील खुलासा हे पत्र मिळाल्या पासून २ दिवसांचे आत खास दूतांकरवी या कार्यालयास दोन प्रतीत न चुकता सादर करण्यांत यावा. तसेच नवीन माध्यमिक शाळा केंव्हापासून सुरु करण्यांत येत आहे. ती तारीख या कार्यालयास कळविण्यांत यावी. ही परवानगी खालील अटींवर देण्यांत येत आहे.

१/- संस्था प्रवेशाचे वेळी कोणतीही देणगी किंवा वर्गणी गोळा करणार नाही किंवा तशी सक्ती विद्यार्थी/पालक/शिक्षक यांच्यावर करणार नाही.

२/- माध्यमिक शाळा संहिता तरतूदीचे व महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी, सेवाशर्ती नियमांचे पालन करील.

३/- पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग, रोस्टरप्रमाणे नेमणूका, शालेय वातावरण योग्य इमारत वरील सर्व अटी संस्थेस मान्य असल्यास, तसे लेखी निवेदन दिल्यावरच प्रथम मान्यतेचा विचार करता येईल.

आपणांस अशी विनंती करण्यांत येते की, आपण माध्यमिक शाळा संहितेतील परिशिष्ट क्र. २ अन्वये आपल्या शाळेच्या मान्यतेसाठी संबंधित शिक्षण निरीक्षक यांचेमार्फत आपला प्रस्ताव २ प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

आपला विश्वासू,

[signature]

शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई.

प्रत - शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, [दक्षिण/उत्तर/पश्चिम विभाग], मुंबई,
त्यांना विनंती करण्यांत येते आहे की, माध्यमिक शाळा संहितेतील नियम क्र. ५.१ अन्वये संबंधित शाळांचे प्रस्ताव त्या शाळांच्या तपासणी अहवालासह या कार्यालयाकडून प्रथम मान्यतेसाठी [आपले अभिप्राय] आपण त्वरित सादर करावेत. सदरची कार्यवाही आपले स्तरावर करुन याबाबतचा आपला अहवाल स्पष्ट अभिप्रायासह त्वरित या कार्यालयास न चुकता सादर करावा. तसेच संस्था वर उल्लेखीलेल्या सर्व अटींची पूर्तता करते आहे किंवा कसे याबाबतचा खुलासाही दोन दिवसांत या कार्यालयास सादर करावा.

सुकूस १०/७